म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ३९२-१

# महाकाव्यांतील गोष्टी

IRBK-0103121
IRBK-0103121

शं. रा. देवळे

३९२९

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं. १४६९

# ...तील गोष्टी

वा. नं.

## भाग दुसरा

नो. नं. १०८३८



IRBK-0103121
IRBK-0103121

श्री. द. मुळे, ... रा. देवळे

१९४८ च्या नव्या अभ्यासक्रमाप्रमाणें इ० दुसरीसाठीं सामान्यज्ञान : इतिहास

# महाकाव्यांतील गोष्टी

## भाग दुसरा


लेखक

श्री. द. मुळे

शिक्षक, म्युनिसिपल मुलांची शाळा नं. ८ पुणें नं. २

शं. रा. देवळे

शिक्षक, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचें मुलांचें हायस्कूल, पुणें नं २.



प्रथमावृत्ति ] किंमत सहा आणे [ सन १९४९

दी टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि., पुणें.



३७२९

# दोन शब्द

विद्याखात्यानें १९४८ सालीं प्रसिद्ध केलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार इयत्ता पहिली आणि दुसरी यांतील विद्यार्थ्यांसाठीं आम्हीं महाकाव्यांतील गोष्टी भाग १ व २ हीं पुस्तकें लिहिलीं आहेत. रामायण हें आपलें राष्ट्रीय महाकाव्य आहे. तसेंच महाभारत हा मनोरंजक वाङ्मयाचा एक ठेवा तर आहेच, पण मुख्यत: तो आपल्या प्राचीन पूर्वजांचा इतिहास आहे. या दोन महाकाव्यांत अनेक कथा आणि उपकथा आहेत. त्यांतील निवडक कथा आम्हीं आपल्या पुस्तकांत घेतल्या आहेत. या गोष्टी मनोरंजक असून बोधप्रदहि आहेत. भाषा सोपी आणि बालबोध असून चित्रेंहि भरपूर घातलीं आहेत. एकंदरीनें हीं पुस्तकें इयत्ता पहिली व दुसरी या वर्गांतील विद्यार्थ्यांना उपयोगी होतील अशी खात्री आहे.

हीं पुस्तकें तयार करतांना 'इतिहास कसा शिकवावा?' या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक प्रा. शं. दा. चितळे यांचें मार्गदर्शन आम्हांला लाभलें. त्यांचे आम्ही ऋणी आहोंत. पुस्तकांची मुद्रणप्रत तयार करण्याच्या कामीं केलेल्या साहाय्याबद्दल श्री. मा. ना. पारखी यांना धन्यवाद. हीं पुस्तकें आकर्षकरीत्या प्रकाशित केल्याबद्दल दी टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि. या संस्थेचेहि आम्ही आभारी आहोंत.

पुणें
ता. १५-२-१९४९

श्री. द. मुळे,
शं. रा. देवळे.

---

अनुक्रमणिका


१. हरिश्चंद्र
२. दिलीप
३. वसिष्ठांची कामधेनु
४. आरुणी
५. कंसवध
६. अर्जुनाची परीक्षा
७. भीम आणि बकासुर
८. भीम आणि मारुती
९. धर्म आणि दुर्योधन
१०. अभिमन्यु
११. सुभद्रा आणि द्रौपदी
१२. ध्रुव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# महाकाव्यांतील गोष्टी

## भाग दुसरा

### १. हरिश्चंद्र

एक होता राजा.

त्याचें नांव हरिश्चंद्र.

तो अयोध्येचा राजा होता.

त्याच्या राणीचें नांव तारामती.

मुलाचें नांव रोहिदास.

एके रात्रीं राजाला स्वप्न पडलें.

स्वप्नांत एक ऋषि आले.

त्यांचें नांव विश्वामित्र.

त्यांनीं राजाजवळ त्याचें राज्य मागितलें.

राजानें तें त्यांना दान दिलें.

दुसरे दिवशीं राजा दरबारांत गेला.

तेथें विश्वामित्र ऋषि आले.
ते राजाला म्हणाले,



“ राजा, काल स्वप्नांत तूं मला राज्य दिलेंस,
परंतु त्यावर दक्षिणाहि पाहिजे मला. ”
राजा दक्षिणा देऊं लागला.
तेव्हां विश्वामित्र म्हणाले,
“ हें राज्य आतां माझें आहे.

माझेच पैसे मला कसे देतोस ?
तूं दुसरीकडे काम करून पैसे मिळव
आणि माझी दक्षिणा पुरी कर. ”
राजानें राणीला आणि आपल्या मुलाला बरोबर घेतलें.
तो दुसऱ्या देशांत गेला.
तेथें त्यानें लोकांचीं लांकडें फोडलीं,
पाणी भरलें; पडेल तें काम केलें.
राणीनें देखील लोकांचीं धुणीं धुतलीं,
दळणें दळून दिलीं; हलकींसलकीं कामें केलीं.
रोहिदासानें आपल्या आईला मदत केली.
त्यांनीं दक्षिणेपुरते पैसे मिळविले.
विश्वामित्रांची दक्षिणा पुरी केली.
विश्वामित्रांना फार आनंद झाला.
त्यांनीं त्याचें राज्य त्याला परत केलें.
हरिश्चंद्रानें खूप हाल सोसले.
पण स्वप्नांत दिलेला शब्द खरा केला.

# २. दिलीप

दिलीप हा अयोध्येचा राजा.
त्याच्या राणीचें नांव सुदक्षिणा.
राजा मोठा शूर आणि दयाळू होता.
त्याला मूलबाळ नव्हतें,
त्यामुळें तो दुःखी होता.

एकदां वसिष्ठ त्याला म्हणाले,
" माझ्याकडे कामधेनूची मुलगी आहे.
तिचें नांव नंदिनी.
तिची तूं सेवा कर,
म्हणजे तुला मूल होईल."

राजा-राणी नंदिनीची सेवा करूं लागलीं.
राजा रोज तिला चरायला सोडी.
नंदिनी कधीं नदीनाल्यांतून जाई.
कधीं कांट्याकुट्यांतून जाई,
तर कधीं अवघड वाटेनें जाई.
जिकडे ती जाई तिकडे राजा जाई.
तो तिची राखण करी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. नं. ३७८८

नंदिनीनें एकदां राजाची परीक्षा पाहाण्याचें ठरविलें.
ती एका जंगलांत शिरली.
तेथें सिंह तिच्यावर झडप घालूं लागला.
गाईनें मोठ्यानें हंबरडा फोडला.
दिलीप राजा धांवतच तेथें गेला.



हात जोडून तो सिंहाला म्हणाला,
" सिंहा, माझ्या नंदिनीला खाऊं नकोस.
मला खा, पण माझ्या नंदिनीला सोड. "

असें म्हणून त्यानें आपली मान सिंहापुढें केली.
इतक्यांत आकाशांतून राजावर फुलांचा पाऊस पडला
आणि सिंह नाहींसा झाला.

नंदिनी त्याला म्हणाली,
" राजा, मीच तुझी परीक्षा पाहिली.
तो कांहीं खरा सिंह नव्हता.
तूं माझी चांगली सेवा केलीस.
तुझी इच्छा पुरी होईल."
पुढें राजाला मुलगा झाला.
त्यानें मुलाचें नांव ' रघु ' असें ठेवलें.



ग्रा. नं. ..........

# ३. वसिष्ठांची कामधेनु

वसिष्ठऋषि हे रामाचे गुरु.

रानांत त्यांची झोपडी होती.

तेथें ते रहात.

त्यांची एक गाय होती.

तिचें नांव कामधेनु.

हवी ती वस्तु ती गाय देई.

एकदां विश्वामित्र राजा वसिष्ठांकडे आला.

त्याच्याबरोबर खूप सैन्य होतें.

वसिष्ठांनीं सर्वांची विचारपूस केली.

त्या सगळ्यांना गोड गोड जेवायला घातलें.

सगळेजण अगदीं खूष झाले.

विश्वामित्र वसिष्ठांना म्हणाला,

"महाराज, तुमच्या झोपडींत तर कांहीं दिसत नाहीं.

मग सगळ्यांना पुरेल एवढें जेवण कसें तयार केलें ?"

वसिष्ठऋषि म्हणाले,

"माझ्याजवळ कामधेनु आहे.

तिनें दिलें हें सगळें."

विश्वामित्र म्हणाला,

" मी तुम्हांला हजार गाई देतों.

पण ही एक गाय मला द्या."

वसिष्ठ म्हणाले " मी देत नाहीं. "

वसिष्ठ गाय देईनात, विश्वामित्र कांहीं ऐकेना.

विश्वामित्र फार संतापला.

गाईला बळेंच नेऊं लागला.

गाईनें मोठा हंबरडा फोडला.

तिनें वसिष्ठांकडे पाहिलें.

तिच्या मनांत जायचें नव्हतें.

राजानें गाईला ओढीत चालविलें,

फरकटत चालविलें;

फटके मारीत मारीत चालविलें.

कामधेनूला आला राग.

ती मोठ्यानें हंबरली.

नों. नं. ३७८५

त्याबरोबर कोठून तरी हजारों शिपाई धांवून आले.
विश्वामित्राच्या सैन्याचा त्यांनीं पराभव केला.
राजाला पिटाळून लावलें.



कामधेनूची सुटका झाली.
ती धांवत धांवत वसिष्ठांकडे आली.
त्यांनीं तिच्या पाठीवरून हात फिरविला.
कामधेनूला आनंद झाला.
वसिष्ठांनाहि आनंद झाला.
विश्वामित्राची फजिती झाली.

# ४. आरुणी

धौम्यऋषींचा शिष्य आरुणी. तो विद्या शिकण्यासाठीं त्यांच्याकडे राहिला होता. आणखीहि बरेच शिष्य तेथें होते. पण आरुणीवरच गुरुजींचें प्रेम अधिक असे. होताच तसा तो शहाणा. आपला पाठ तो उत्तम तयार करीत असे. गुरुजींचें काम तो मनापासून करीत असे.

एकदां गुरुजींनीं आरुणीची परीक्षा पाहावयाचें ठरविलें. ते त्याला म्हणाले, “आरुणी, आपलें शेत डोंगराच्या पायथ्याशीं आहे. त्यांत डोंगरावरील पाणी येतें. पण शेताचे बांध भक्कम नाहींत. भाताचें पीक कांहीं चांगलें येत नाहीं. तूं शेतांत जा आणि बळकट बांध घालून पाणी अडव.”

आरुणी शेतांत गेला. त्यानें दगडांचे आणि चिखलाचे बांध घातले. कांहीं बांध टिकले, पण एक बांध कांहीं टिकेना. पाणी कांहीं शेतांत राहीना. आतां काय करावें? इतक्यांत त्याला एक युक्ति सुचली. तो तेथें

आडवा निजला. त्यानें आपल्या शरिराचा बांध घातला. आतां शेतांत पाणी राहूं लागलें.

संध्याकाळ झाली तरी आरुणी आला नाहीं म्हणून गुरुजी शेताकडे गेले. त्यांच्याबरोबर कांहीं शिष्यहि होते. गुरुजींना आरुणी कोठें दिसेना. त्यांनीं आरुणीला हांक मारिली, " आरुणी, कोठें आहेस तूं ? " आरुणी निजल्या निजल्याच म्हणाला, " गुरुजी, हा मी येथें आहें. "



गुरुजी पाहतात तों आरुणी तेथें निजलेला ! त्यानें

आपल्या शरिराचा शेताला बांध घातलेला! गुरुजींना मोठें कौतुक वाटलें. ते म्हणाले, "आरुणी ऊठ." पण आरुणी म्हणाला, "गुरुजी, मी उठलों तर पाणी वाहून जाईल." गुरुजी म्हणाले, "नाहीं. तें वाहून जाणार नाहीं. ऊठ तूं."

गुरुजींनीं आरुणीला जवळ घेऊन त्याच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरविला आणि त्याला शाबासकी दिली. आरुणी पुढें खूप विद्या शिकला.



# ५. कंसवध

मथुरेला कंसाकडे आज फार गडबड होती. चाणूर आणि मुष्टिक हे कंसाकडील पहिलवान कृष्ण आणि बलराम यांच्याशीं कुस्ती खेळणार होते. कृष्णाला मारण्याचा कंसाचा हा एक डाव होता.

कृष्ण आणि बलराम कंसाच्या राजवाड्याजवळ आले. कृष्णाला पाहून सर्व लोकांना आनंद वाटला. कंसमामा मात्र रागानें लाल झाले होते. कृष्ण राजवाड्याच्या चौकांत आला. इतक्यांत एक माजलेला हत्ती कृष्णाच्या अंगावर धांवून आला. कंसानेंच तो सोडला होता. कृष्ण घाबरला नाहीं. त्यानें पटकन त्या हत्तीचे दांत घट्ट धरले आणि झटकन ते मोडले. हत्तीचें तोंड रक्तबंबाळ झालें. 'चीं चीं' करीत हत्ती दूर पळून गेला. आतां मात्र कंसाला कृष्णाची भीति वाटली. सर्व लोकांनीं कृष्णाला शाबासकी दिली.

नंतर कृष्ण आणि बलराम हौद्याजवळ गेले. त्यांनीं दंड थोपटले.

आतां कुस्ती सुरू झाली होती. ताड् ताड्! टक्टक्! धुम् धडाड् धप्प!! असे सारखे आवाज येत होते. बलरामानें मुष्टिकास जोरानें आपटून मारलें. कृष्णानें



चाणूराच्या छातींत जोरानें गुडघा मारला. त्या जोराच्या ठोशानें चाणूर मेला. सर्व लोकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला.

आतां कंस राजा थरथर कापूं लागला. कृष्णानें वाघासारखी उडी मारून कंसाची मान धरली. कंसानें खूप धडपड केली. दोघांची हाणामारी सुरू झाली. कृष्ण फार चपळ आणि बळकट होता. कृष्णानें कंसाचे केंस धरून त्यास धाडकन जमिनीवर आपटलें. पडलेल्या कंसाच्या छातीवर गुडघा रोवून कृष्णानें त्याचा गळा दाबला. ‘ओय् ओय् ’ असें ओरडत कंस मरण पावला.

दुष्टाचा नाश झाला. सगळे लोक आनंदानें उड्या मारूं लागले. त्यांनीं कृष्णाची थाटाची मिरवणूक काढली.

---

# ६. अर्जुनाची परीक्षा

कौरव-पांडव लहान होते. ते द्रोणाचार्यांच्याकडे विद्या शिकत. द्रोणाचार्य त्यांचे गुरुजी. ते त्यांना नेम मारायला शिकवीत.

एकदां द्रोणाचार्यांनीं त्यांची परीक्षा घेण्याचें ठरविलें. समोर एक झाड होतें. द्रोणाचार्यांनीं एक नकली पोपट तयार केला. झाडाच्या उंच फांदीवर तो बसविला.



आपल्या शिष्यांना त्यांनीं झाडाखालीं बोलाविलें आणि ते सर्वांना म्हणाले, 'त्या फांदीवरील तो पोपट पाहा. त्याच्या डाव्या डोळ्यावर नेमका बाण मारावयाचा आहे.



आपआपले धनुष्य-बाण घ्या आणि एकएकजण पाळी-पाळीनें पुढें या.'

प्रथम दुर्योधन पुढें आला. त्यानें धनुष्याला बाण लावला. पोपटावर नेम धरला. पण गुरुजींनीं त्याला थांबविलें. ते त्याला म्हणाले, " तुला समोर काय काय दिसतें ? " दुर्योधन म्हणाला, " मला समोर आकाश दिसतें झाड दिसतें. आणि पोपटहि दिसतो. " गुरुजी म्हणाले, " थांब जरा. " नंतर धर्मराज पुढें आला. त्याला त्यांनीं विचारलें, " तुला काय काय दिसतें ? " तो म्हणाला, " मलाहि झाड दिसतें, फांद्या दिसतात, पोपटाहि दिसतो." गुरुजींनीं त्यालाहि थांबविलें.

नंतर भीम पुढें आला. त्याला गुरुजींनीं विचारलें, " तुला काय काय दिसतें ? " तो म्हणाला, " मला

सर्व कांहीं दिसतें आहे. आकाश, झाड, फांद्या, पानें आणि पोपट. ” त्यालाहि गुरुजींनीं खालीं बसविलें.

एकेकजण पुढें येई. गुरुजी त्यांना तोच प्रश्न विचारीत. सगळेजण तेंच उत्तर देत. गुरुजी त्यांना खालीं बसवीत.

शेवटीं अर्जुनाची पाळी आली. गुरुजींनीं विचारलें, “ अर्जुना, तुला रे काय काय दिसतें ? ” अर्जुन नेम धरून म्हणाला, “ गुरुजी, मला फक्त पोपटाचा डावा डोळा दिसत आहे. दुसरें कांहींहि दिसत नाहीं. ” गुरुजी म्हणाले, “ शाबास ! मग सोड तर बाण. ”

अर्जुनानें बाण सोडला आणि पोपटाचा नेमका डावा डोळा फोडला. अर्जुन परीक्षेत पास झाला. गुरुजींनीं त्याची खूप वाहवा केली.

## ७. भीम आणि बकासुर

एक होता राक्षस. त्याचें नांव होतें बकासुर. त्याचें तोंड बगळ्यासारखें लांब होतें. त्याचे डोळे गाडीच्या चाकाएवढाले होते. लाल! लाल !! लाल !!! त्याचें अंग काळें काळें कुट्ट होतें. त्याचे कान सुपासारखे होते. तो जनावरें मारून खात असे. तो माणसें मारून खात असे.

एकदां बकासुर एका गांवांत शिरला. घरोघरचा एक माणूस तो दररोज खाऊं लागला. पांडव त्या गांवांत आले. त्यांस ही गोष्ट समजली. पांडवांना राक्षसाचा राग आला. पांडव फार दयाळू होते. भीम म्हणाला, " मी बकासुराची खोड मोडतों. मी बकासुराला ठार मारतों."

मग भीमानें गाडाभर भात घेतला. गाड्याला रेडा जोडला आणि भीमदादा गाड्यावर बसून गेले. जंगलांत बकासुराचा वाडा होता. वाड्याबाहेर भीमानें गाडा सोडला. झाडाला रेडा बांधला. भीमदादा भात खात बसले.

बकासुर रागानें बाहेर आला. तो भीमाला जोरानें



बुक्क्या मारूं लागला. भीम म्हणाला, " आणखी जोरानें मार. माझें अंग चांगलें रगडून निघतें आहे. " मग बकासुर खवळला. भीम ढेंकर देऊन उठला. भीम आणि बकासुर यांची कुस्ती झाली. भीमानें बकासुराला चीत केलें. पायाला धरून गरगर फिरविलें आणि जमिनीवर आपटून ठार मारलें. बकासुर मेला. लोकांना फार आनंद झाला. लोक भीमाची वाहवा करूं लागले.

# ८. भीम आणि मारुती

धर्म, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे पांच पांडव. त्यांच्यांत भीम हा फार दांडगा होता. त्याच्या वाटेस कोणी जात नसे. सगळेजण त्याला भिऊन असत. मोठेमोठे राक्षससुद्धां भीमाला घाबरत. भीम होताच तसा दांडगा. भीम नेहमीं ऐटीनें म्हणायचा, " काय बिशाद आहे, माझी खोडी कोणी करील ! "

एकदां भीमाची चांगलीच गंमत झाली. तो एका रानांत फिरायला गेला. तो एका अगदीं लहान पाऊल-वाटेनें चालला होता. तेथें एक वानर आपली शेपटी रस्त्यावर पसरून बसला होता. भीम त्या वानराजवळ आला तरी वानर आपला तसाच वाटेवर बसलेला. तो कांहीं हलेना. भीमाला राग आला. तो म्हणाला, " काय रे ए माकडा, रस्त्यांत शेपटी टाकून काय बसला आहेस ? उचल ती शेपटी आणि हो बाजूला. "

वानर म्हणाला, " काय करूं रे बाबा, मी आतां फार म्हातारा झालों आहें. बसल्या जागेवरून मला उठवतदेखील नाहीं. तूंच तेवढी माझी शेपटी बाजूला कर आणि जा रस्त्यानें."

भीम खवळला. पुढें झाला आणि शेपटी उचलूं लागला; पण काय गंमत ! भीमाला कांहीं केल्या ती शेपटी उचलेना. त्यानें खूप जोर केला. दोन्ही हातांनीं धरून



शेपटी उचलण्याचा यत्न केला. पण शेपटी जरादेखील त्याला उचलतां आली नाहीं.

वानर म्हणाला, "अरे, उचल शेपटी ! तूं एवढा बलवान ना ? मग शेपटी नाहीं उचलतां येत ?" वानर हंसूं लागला. भीमाला लाज वाटली. त्यानें मुकाट्यानें आपली मान खालीं घातली.

शेवटीं त्या वानरानें आपली शेपटी सहज बाजूला केली. भीमाचा गर्व नाहींसा झाला. त्यानें त्या वानराला नमस्कार केला आणि तो खजील होऊन पुढें चालूं लागला.

हा वानर कोण होता आहे ठाऊक ? तो मारुती होता.

---

म. श्री. सं. टाणे.
3,129
भा. बा

# ९. धर्म आणि दुर्योधन

पांडव वनवासांत होते. कौरवांना वाटलें, रानांत आपले गौळवाडे आहेत, ते पाहण्याच्या निमित्तानें तेथें जावें. पांडवांना आपली श्रीमंती दाखवावी. त्यांना थोडेंसें खिजवावें. म्हणून त्यांनीं दास दासी बरोबर घेतल्या. हत्ती, घोडे बरोबर घेतले. सगळे रानांत गेले.

त्यांनीं रानांत गौळवाडे पाहिले. आतां ते पांडवांकडे यावयास निघाले. वाटेंत त्यांना एक सरोवर लागलें. तेथें कांहीं गंधर्व पोहत होते. कौरवांना वाटलें आपणहि पोहावें. पण गंधर्व कांहीं त्यांना पोहूं देईनात. कौरवहि ऐकेनात. तेव्हां त्यांची आणि गंधर्वांची लढाई जुंपली. गंधर्वांनीं कौरवांचा पराभव केला. त्यांना कैद करून ते घेऊन चालले.

ही बातमी पांडवांना समजली. सर्वांना आनंद झाला. पण धर्मराजांना मात्र वाईट वाटलें. ते आपल्या भावांना म्हणाले, “ तावडतोब जाऊन कौरवांची सुटका करा.”

पण भीम आणि अर्जुन म्हणाले, “ कौरव दुष्ट आहेत. त्यांची खोड मोडली हें बरेंच झालें !”

धर्मराज म्हणाले, " नाहीं. हें बरें झालें नाहीं. कसेंहि झालें तरी कौरव आपले भाऊ आहेत. आपसांत भांडतांना ते शंभर आणि आपण पांच; पण दुसऱ्या शत्रूंशीं लढतांना आपण सर्व मिळून एकशेंपांच आहोंत. परक्या शत्रूशीं लढतांना आपण एकी केली पाहिजे. शत्रूचा नाश केलाच पाहिजे.



धर्मराजांचें म्हणणें त्यांना पटलें. ते सर्वजण गंधर्वांवर चालून गेले. त्यांनीं त्यांचा पराभव केला; कौरवांची सुटका केली. कौरव असे लाजले कीं कांहीं विचारूं नका ! मुकाट्यानें माना खालीं घालून ते परत गेले.

---

## १०. अभिमन्यु

कौरवपांडवांचें युद्ध सुरू झालें. युद्ध करतां करतां अर्जुन बराच दूर गेला होता. कौरवांनीं ही संधि साधली. द्रोणाचार्य कौरवांचे सेनापति. त्यांनीं सैन्याची चाकासारखी रचना केली. अशा रचनेला ' चक्रव्यूह ' म्हणतात.

' चक्रव्यूह ' कोणालाच फोडतां येत नव्हता. पांडवांना मोठी पंचाईत पडली. इतक्यांत अभिमन्यु पुढें झाला. अभिमन्यु अर्जुनाचा मुलगा. तो धर्मराजांना म्हणाला, " काका, मला सांगा. मी चक्रव्यूह फोडतों. कौरवांच्या सैन्याचा नाश करतों."

त्या वेळीं अभिमन्यु लहान होता. अवघा सोळा वर्षांचा. धर्मराज त्याला परवानगी देईनात; पण अभिमन्यूनें अगदीं हट्टच धरला. तेव्हां त्यांनीं कशीबशी परवानगी दिली.

अभिमन्यु चक्रव्यूहांत शिरला. जोराची लढाई सुरू झाली. अभिमन्यूनें कौरवांचें खूप सैन्य मारलें. मोठमोठ्या वीरांना त्यानें पळवून लावलें. कौरवांना वाटलें, हा एवढासा मुलगा आपल्याला हरवणार. आपली फजिती करणार! म्हणून सगळ्यांनीं त्याला घेरलें. कर्णानें मागून येऊन त्याचें धनुष्य मोडलें. द्रोणाचार्यांनीं त्याच्या सारथ्याला ठार मारलें. त्याचा रथ मोडून टाकला. तरी अभिमन्यु मुळींच घाबरला नाहीं. तो तलवार घेऊन लढूं लागला. पण दुर्योधनानें त्याच्या तलवारीचाच तुकडा पाडला. इतक्यांत दुःशासनाचा मुलगाहि गदा घेऊन त्याच्यावर धांवून आला. अभिमन्यूनेंहि गदा घेतली. दोघांची जंगी लढाई जुंपली. दोघेहि एकमेकांच्या घावांनीं बेशुद्ध पडले. पण दुःशासनाचा मुलगा लक्ष्मण आधीं शुद्धीवर आला. अजून अभिमन्यु बेशुद्धच होता. तरी लक्ष्मण त्याच्यावर धांवून गेला. अभिमन्यूच्या डोक्यांत गदा घालून

त्यानें त्याचा प्राण घेतला. जयद्रथानें त्याच्या डोक्यावर लाथ मारली.



अभिमन्यु बाळ पांडवांना सोडून गेला ! पांडवांना अतिशय दुःख झालें. पुढें युद्धांत त्यांनीं कौरवांचा चांगलाच सूड घेतला.

## ११. सुभद्रा आणि द्रौपदी

सुभद्रा—फार दिवसांनीं येणं झालं दादा ?

कृष्ण—आज सहज आठवण झाली बहिणीची. म्हटलं खावं बहिणीच्या हातचं कांहीं मिळालं तर.

सुभद्रा—चल; उगीच नको सांगू. त्या तुझ्या लाडक्या द्रौपदीची उष्टी भाजीच तुला आवडते; मग माझ्याकडची पोळी कशी गोड लागणार तुला ?

कृष्ण—हें बघ सुभद्राताई, मला लागलीय भूक. उगीच बोलणें लांबवूं नकोस. दोघीहि बहिणी मला सारख्याच !

सुभद्रा—बरं बाई ! कोणता पदार्थ तयार करूं? लाडू, करंज्या, अनारसे.......

कृष्ण—अग, पण ते तसले पदार्थ भाऊबिजेला वाढ ! तोंपर्यंत माझें पोट—

सुभद्रा—तोंवर हे आंब्याचे पाड खा. हो पण थांब. मी घरांतून विळी आणतें. थोडेंसें दूधहि आणतें हं गरम करून !

(सुभद्रा जाते. कृष्ण चाकूनें पाड कापतो पण बोट चिरलें जातें.)

कृष्ण—अरे अरे ! काय रक्त चाललं आहे. सुभद्राताई, अग, एकादी चिंधी आण कीं.

सुभद्रा—अगो बाई ! कृष्णा ! किती रे उतावळा आहेस तूं ? बघ ना किती कापलें आहे बोट. दाबून धर म्हणजे आपोआप थांबेल रक्त. नाहींतरी अगदीं लहानपणापासून तूं आहेसच असा खोडकर. अरे, तें बोट असं वर धर. अग ए मीनाक्षी, चपले, चंचला ऽ ऽ.... कुठं गेल्या या दासी तरी ? एऽगंगा ऽ

कृष्ण—अग ताई, तूंच आण कीं शोधून चिंधी.

सुभद्रा—अरे, आमच्या घरांत सारे जरीचे कपडे. फाटकी चिंधी एकाद्या दासीकडेच असेल.

कृष्ण—कांहीं कर, पण चिंधी दे म्हणजे झालें.

सुभद्रा—बरं बाई, आणतें; पहातें, शोधतें.

( सुभद्रा जाते, इतक्यांत द्रौपदी तेथें येते. )

कृष्ण—ये. द्रौपदी ! कशी अगदीं वेळेवर आलीस.

द्रौपदी—हें काय दादा ? कशानें कापलें बोट ? चिंधी नाहीं का बांधलीस अजून ? थांब ! .... ही बघ चिंधी.

कृष्ण—अरे अरे ! भरजरीचा शालू तो. माझ्या बोटासाठीं टरकन फाडलास तूं द्रौपदी ?

द्रौपदी—थांब रे बाबा. अगोदर जखम बांधू दे. माझ्या दादाच्या रक्तापुढं ह्या शालुचा रे काय पाड ! हं ! बघ आतां थांबलं रक्त.

सुभद्रा–( येऊन ) : हं ! ही बघ आणली जुनी चिंधी; आणि हें काय ? जखम तर बांधलेली दिसते. ही रे कसली चिंधी ? अगबाई ! शालूचा पदर !

कृष्ण–ही वेडी उतावळी द्रौपदी ! तूं चिंधी आणी-पर्यंत तिला दमच निघाला नाहीं. टरकन शालूचा पदर फाडला बघ तिनं चिंधीसाठीं.



सुभद्रा ( मान खालीं घालून ) : दादा, मी चुकलें

द्रौपदीच जास्त प्रेमळ आहे हें मला आज पटलें. तीच खरी बहीण आहे तुझी !

मला जरीच्या कपड्यांची किंमत जास्त वाटली, पण द्रौपदीच्या मनाचा मोठेपणा फार भारी आहे. द्रौपदी मला क्षमा कर !

द्रौपदी—चल वेडी कुठली. चल रे दादा घरांत. थोडं गरम दूध तरी घेऊं !

कृष्ण—हो हो ! दूधच कां नुसतें ? लाडू, करंज्या, अनारसे........लहानपणापासूनची खादाड-पणाची संवयच आहे मला. चला........

(जातात.)

---

# १२. ध्रुव

एक होता राजा. त्याचें नांव उत्तानपाद. त्याला दोन राण्या होत्या. एक आवडती आणि दुसरी नावडती. नावडतीला एक मुलगा होता. त्याचें नांव ध्रुवबाळ. ध्रुवबाळ फार हुषार होता. तो सर्वांना फार आवडे.

एके दिवशीं ध्रुवबाळ राजाच्या मांडीवर बसला होता. आवडत्या राणीला राग आला. तिनें ध्रुवाला खसकन खालीं ओढलें. ध्रुव रडत रडत आपल्या आईकडे गेला. आईनें त्याची समजूत केली; पण ध्रुवाचें रडणें थांबेना.

आई म्हणाली, "बाळ, देवानेंच आपल्याला खालची जागा दिली आहे. उंच जागेवर बसायला देवाची दया लागते. तो देव तर दूर दूर जंगलांत कोठें तरी लपला आहे."

ध्रुवानें डोळे पुसले आणि तो म्हणाला, "आई, मी देवाला शोधून काढणार! त्याची दया मागणार

आणि माझ्यासाठीं उंच ठिकाणीं त्याच्याकडून जागा मागून घेणार अशी जागा घेईन कीं, तेथून कोणी मला "उठ" म्हणणार नाहीं.!"

आई म्हणाली, "नको बाळ. तूं दूर जाऊं नको. तुला देव भेटणार नाहीं. पण ध्रुवबाळ ऐकेना. तो दूर दूर गेला.



दाट दाट जंगलांत ध्रुव जाऊन बसला. त्यानें देवाची खूप सेवा केली. जंगली जनावरांना ध्रुव भ्याला नाहीं. तो सारखा देवाचें नांव घेत बसला. कांहीं

दिवसांनीं त्याला देव भेटला. देवानें ध्रुवाला आकाशांत उंच जागा दिली. ध्रुव तेथें जाऊन बसला. त्याला तेथून कोणी ‘ उठ ’ म्हणत नाहीं. ध्रुवाचा तारा तेथें अढळ झाला. तो सर्वांना अजूनहि उत्तरेकडे दिसतो. पहा !

---

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
अ. क्र. ३१२१ नों. दि. ........
वि. ........ ता. ........
बा-१।.



## व्यवसाय

१. उत्तरें द्याः–

(१) हरिश्चंद्रानें स्वप्नांत कोणास काय दिलें ?

(२) गुरुजींनीं आरुणीला कां शाबासकी दिली ?

(३) बाण मारीत असतां अर्जुनाला काय दिसत होतें?

(४) बकासूर भीमावर कां रागावला ?

२. योग्य नांव घालून पुढील कोष्टक भरा.

| | नांव |
|---|---|
| कामधेनूस छळणारा | |
| चक्रव्यूह फोडणारा | |
| चिंधी बांधणारी | |
| अढळ जागीं बसलेला | |

३. प्रत्येकासंबंधीं एक वाक्य सांगा :–

सुभद्रा, कंस, द्रोणाचार्य, धौम्यऋषि.

४. या पुस्तकांतील एक गोष्ट पाठ करा व आपल्या लहान भावास ती सांगा.

५. तुम्हांस कां आवडतात ?

दिलीप, द्रौपदी, अर्जुन, श्रीकृष्ण, हरिश्चंद्र,

६. पांडव किती होते ?

कौरव किती होते ?

कृष्णाला किती बहिणी होत्या ?

---

म. ग्रं. सं. ठाणे,
IRBK-0103121
IRBK-0103121

---

Printed by **N. S. Kulkarni**, S. T. C., T. D., at the Teachers' Printing Press, 77 Shanwar, Poona and published by him for the Teachers' Ideal Publishing House Limited, 77 Shanwar, Poona 2.